# ज.ए.इ. ची पूर्व प्राथमिक शाळा (सुभेदार वाडा) कल्याण (प.)

## ✻ वार्षिक अहवाल डिसेंबर २०१३- डिसेंबर२०१४ ✻

सस्नेह नमस्कार!

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक, कल्याण(प.) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

✻ नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण मधील सुभेदार वाड्यात सुरु झाली. सध्या शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात मोठा शिशुवर्गाचे ४ वर्ग, छोटा शिशुवर्गाचे ४ वर्ग आणि नर्सरीचा १ वर्ग असून एकूण ४५८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एक मुख्याध्यापिका, सात शिक्षिका, एक संगीत शिक्षिका, दोन हंगामी शिक्षिका, संस्था पातळीवरील एक लेखनिक, चार सेविका व हंगामी २ सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.

✻ शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. दीपपूजा, रक्षाबंधन, बैलपोळा, नागपंचमी, दही हंडी, भोंडला, संक्रांत, शेकोटी, दसरा, रंगपंचमी, होळी इत्यादी. दर चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे सामुहिक वाढदिवस साजरे केले.

✻ दर बुधवारी विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊ दिला जातो.

✻ दि. ९ ऑक्टोबर रोजी 'छोटा भीम' फिल्म दाखवण्यात आली.

✻ एम्. एच्. हायस्कूल ठाणे या शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या सर्व शाळांमध्ये 'रंगभरण स्पर्धा' घेण्यात आली. या स्पर्धेत कु. पार्थ आव्हाड यास बक्षिस मिळाले.

✻ संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या कै. एन्. टी. केळकर स्मृती चित्रकला स्पर्धेत कु. जिज्ञासा शेट्ये हिने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.

✻ मुथुट फायनान्स तर्फे रंगभरण स्पर्धा १० जानेवारीला घेण्यात आली. त्यात अनेक विद्यार्थ्यांनी यश संपदान केले.

✻ दि. १६ जानेवारी व १७ जानेवारी २०१४ रोजी छोटा मोठा शिशु व नर्सरीच्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आला.

✻ संस्थेतर्फे झालेल्या आंतरशालेय नाट्य स्पर्धेत शाळेने सादर केलेल्या 'फळांची कहाणी' या

नाटकास द्वितीय क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले. लेखनाचे द्वितीय पारितोषिक शाळेतील शिक्षिका सौ. नीता रामतीर्थ यांना मिळाले. तर दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक सौ. जयश्री सोनार व सौ. नीता रामतीर्थ यांना मिळाले.

* शिक्षक कर्मचारी संघाच्या 'नात्यांचा अविष्कार' या कार्यक्रमातील समुहनृत्यास प्रथम क्रमाकांचे बक्षिस मिळाले. यात सर्व शिक्षकांचा सहभाग होता. सौ. नीता रामतीर्थ व सौ. ऐश्वर्या निमकर यांना विशेष पारितोषिक मिळाले.
* दि. २ फेब्रुवारी रोजी 'नाना-नानी डे' हा उपक्रम करण्यात आला. आजी आजोबांचे स्वागत विद्यार्थ्यांनी तयार केलेले भेटकार्ड देऊन केले. आजी-आजोबांसाठी 'मटार सोलणे' ही स्पर्धा घेण्यात आली. आयत्या वेळी मजेशीर विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. त्यात १५० उपस्थित आजी-आजोबांनी सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला.
* बालवाडीतील विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता त्यांना जाण्यायेण्यासाठी स्वतंत्र मार्गाची नितांत गरज होती. अशी मागणी करताच संचालक मंडळ सदस्य व शालेय समितीचे सदस्य श्री. सरदेसाई सर यांनी त्याचा पाठपुरावा करुन स्वतंत्र वहिवाट सुरु करुन दिली. यात त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.
* विद्यार्थ्यांची सहल 'एन्जॉय फार्म हाऊस' पांजरपोळ या ठिकाणी नेण्यात आली.
* विद्यार्थ्यांनी रंगांची ओळख व्हावी म्हणून दि. १० मार्च ते १८ मार्च पर्यंत रंगाचा आठवेडा साजरा करण्यात आला.
* दि. १ मार्च रोजी मोठा शिशुच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यात आला.
* दि. २२ मार्च ते ५ एप्रिल पर्यंत मोठा शिशु व छोटा शिशु विद्यार्थ्यांची तोंडी व लेखी परीक्षा घेण्यात आली.
* शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. मंगला विजय जाधव या दि. ३१ मे २०१४ रोजी सेवा निवृत्त झाल्या.
* ऑल इंडिया ड्रॉईंग कॉम्पीटीशन २०१४ नवनीत एज्युकेशन लिमिटेड स्टेशनरी डिव्हीजन तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली. १) कु. तन्वी तलवारे, २) कु. मनस्वी चव्हाण, ३) कु. मयुरी कुलकर्णी, ४) कु.संजना धोंगडे, ५) कु. प्रणय पवार.
* सप्तकिरण संस्था सोहम् फाऊंडेशन आयोजित आंतरशालेय ऱ्हिदमिक जिम्नॅस्टिक क्राडी प्रकारातील ८ वर्षाखालील गटात कु. चार्वी ढवळे हिस तृतीय क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले.

- ❊ गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांच्या बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. हा संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनीच साजरा केला.
- ❊ १ ऑगस्ट टिळक पुण्यतिथी निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे परीक्षण माजी शिक्षिका सौ. साधना डांगे यांनी केले.
  नर्सरी स्पर्धा - रांगत जाणे. प्रथम क्रमांक कु. अभंग बैरागे,
  छोटा शिशु स्पर्धा-मणी ओवणे. प्रथम क्रमांक - कु. नंदू भोईर, द्वितीय क्रमांक - कु. सुमीत भोसले, तृतीय क्रमांक - कु. चैतन्या जाधव, उत्तेजनार्थ - कु. भाविका म्हात्रे,
  मोठा शिशु स्पर्धा - उलट चालणे, प्रथम क्रमांक - कु. तन्वी तलवारे, द्वितीय क्रमांक - कु. प्रसाद आव्हाड, तृतीय क्रमांक - कु. पूर्वा पाटील, उत्तेजनार्थ - कु. रिद्धी सकपाळ.
- ❊ दरवर्षी प्रमाणे शारदोत्सव ४ दिवस साजरा करण्यात आला. यात देवीची स्थापना, विद्यार्थ्यांसाठी भोंडला व पालकांचा भोंडला, दसऱ्याच्या दिवशी पाटीपूजन यांचे आयोजन केले होते.
- ❊ दि. २८ ऑगस्ट रोजी मातृदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पूजन केले.
- ❊ दि. २६ ऑगस्ट रोजी गणपतीबाप्पाचे आगमन केले होते. गणपतीची मिरवणूक शाळेच्या आवारातून काढली होती. हे दोन्ही कार्यक्रम नर्सरीच्या विद्यार्थ्यांसाठी होते.
- ❊ दि. ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेत खालील शिक्षकांना बक्षिसे मिळाली.
  स्पर्धा - रिंगेत चेंडू टाकणे. या स्पर्धेचे परीक्षण माजी मुख्याध्यापिका श्री. उपळाणी यांनी केले.
  प्रथम क्रमांक - श्रीमती वैशाली देवळे
  द्वितीय क्रमांक - सौ. सुनिता निकम व सौ. निलिमा बिडवे (विभागून)
  तृतीय क्रमांक - सौ. जयश्री सोनार
  उत्तेजनार्थ - सौ. नीता रामतीर्थ
- ❊ संस्कृत भाषा प्रसारणी सभेचे सुरवाणी ज्ञान मंदिर संस्थेतर्फे श्री. भी. वेलणकर जन्मशताब्दी निमित्त घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेत सहशिक्षिका सौ. रश्मी दिघे यांना १०१ रु. रोख व प्रमाणपत्र या स्वरुपात उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.
- ❊ खास आजी-आजोबांसाठी 'नक्षत्रांचे देणे' हा कार्यक्रम दि. ७ ऑक्टोबर रोजी साजरा केला. यात पूर्व प्राथमिक व प्राथमिकच्या शिक्षकांनी सामुहिक व वैयक्तिक गाणी सादर केली. डॉ.सौ. भाग्यश्री मोघे 'स्त्री रोग तज्ज्ञ' या उपस्थित होत्या.

* बालदिनाचे औचित्य साधून दि. १४ नोव्हेंबर रोजी शिक्षक पालक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. नर्सरी स्पर्धा - बेडूक उड्या मारणे. छोटा शिशु - विठ्ठल उडी मारणे, मोठा शिशु - लंगडी घालणे.
* शिक्षक-पालक संघातर्फे एका कार्यशाळेचे आयोजन दि. १२ ऑक्टोबर रोजी केले होते. रोजच्या धकाधकीच्या जीवनात उत्तम पालकत्व कसे असावे, पाल्याचे संगोपन कसे करावे याचे व येणाऱ्या अडचणींचे निवारण कसे करावे याचे उत्तम मार्गदर्शन 'शेपिंग इंडिया' च्या माध्यमातून पालकांना करण्यात आले.
* दि. २ डिसेंबर रोजी शैक्षणिक साहित्यावर आधीरत प्रकल्पाचे आयोजन केले होते. प्रकल्पाचे उद्घाटन सौ. नम्रता चौधरी मुख्याध्यापिका पूर्व प्राथमिक विभाग मांडा-टिटवाळा यांच्या हस्ते करण्यात आले. भाषा, गणित, इंग्रजी, सामान्यज्ञान, जीवन व्यवहार, इंद्रिय शिक्षण, हस्तकला, चित्रकला, चिकटकाम, मातीकाम इत्यादी वेगवेगळ्या विषयातून अभ्यासाचा श्रीगणेशा होतो. त्याचे दृश्य स्वरुप या प्रकल्पातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे हाच या प्रकल्पामागचा खरा उद्देश होता.
* ज.ए. इ. च्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये श्री. सी.एम. पुराणिक सरांच्या नेतृत्वाखाली 'प्रगती पॅनल'चा प्रचंड मतांनी विजय झाला. तरी सर्व विजयी उमेदवारांचे पूर्व प्राथमिक शाळेतर्फे हार्दिक अभिनंदन! संस्थेच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!
* शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतकांनी संस्थेकडे काही ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यातूनच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त घेण्यात येणाऱ्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात येतात. असे आमचे विद्यार्थी अनेक क्षेत्रात प्रगती करुन यशस्वी होऊन शाळेचा उत्कर्ष वाढवतात.

अशा प्रकारे आपल्या विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत असतात. त्यास यश मिळावे हीच प्रार्थना!

धन्यवाद!

सौ. रसिका यशवंत जांभुळकर
मुख्याध्यापिका
ज.ए.इ.ची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण (प.)

संकलन : श्रीमती वैशाली विवेक देवळे (सहाय्यक शिक्षिका)